# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ५५/२०२१** **दिनांक ०९/०७/२०२१** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०७/२०२१ ते ०९/०७/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०७/२०२१ सकाळी ८:३० पासून १४/०७/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **०३/०७** | **०४/०७** | **०५/०७** | **०६/०७** | **०७/०७** | **०८/०७** | **०९/०७** | | **१०/०७** | **११/०७** | **१२/०७** | **१३/०७** | **१४/०७** |
| ५.६ | ३.६ | ०.६ | १.० | ०.० | ४४.४ | ४४.२ | पाऊस (मिमी) | १५० | १३८ | १७२ | १८१ | १४५ |
| ३०.३ | ३०.६ | ३०.७ | ३१.४ | ३०.९ | ३१.५ | २८.५ | कमाल तापमान (अं.से) | २८ | २८ | २९ | २८ | २९ |
| २३.७ | २२.८ | २३.२ | २३.२ | २३.५ | २३.५ | २४.० | किमान तापमान (अं.से) | २३ | २३ | २३ | २३ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९३ | ९५ | ९० | ९२ | ९० | ९८ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९१ | ९० | ९३ | ९५ | ९४ |
| ७५ | ८४ | ७७ | ७४ | ७८ | ९६ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७८ | ७५ | ८२ | ९२ | ९२ |
| ४.९ | ४.९ | ३.७ | ४.२ | ३.२ | ३.९ | ६.५ | वाऱ्याचा वेग(किमी/तास) | ६ | ९ | ९ | ९ | १४ |
| वा.प. | नै. | प. | नै.प. | वा.प. | नै. | शांत | वाऱ्याची दिशा | नै. | प. | वा.प. | नै.प. | प. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **९८.४** | **१८०७.६** | **४१४५.४** |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांश ठिकाणी दिनांक १० ते १४ जुलै, २०२१ दरम्यान जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.** |
| **इशारा** | **रत्नागिरी जिल्ह्यामधील तुरळक ठिकाणी दिनांक ९ ते ११ जुलै, २०२१ दरम्यान जोरदार ते अतिजोरदार पाऊस आणि दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार तसेच अत्यंत जोरदार (२०४.५ मि.मी. पेक्षा जास्त) पाऊसाचा इशारा आणि दिनांक १३ जुलै, २०२१ ला जोरदार ते अतिजोरदार पाऊस जिल्ह्यातील काही ठिकाणी तर अत्यंत जोरदार पाऊसाचा इशारा तुरळक ठिकाणी देण्यात आला आहे.** |
| **विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोंकण विभागात दिनांक १४ ते २० जुलै, २०२१ दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त तसेच कमाल आणि किमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | -- | • जोरदार ते अति जोरदार पाऊसाचा अंदाज वर्तविण्यात आला असल्याने पिकांना देण्यात येणारी खत मात्रा आणि कीटकनाशक फवारणीची कामे पुढे ढकलावीत. |
| **विशेष सल्ला** | -- | • दिनांक १० ते १४ जुलै, २०२१ दरम्यान जिल्ह्यातील बहुतांशी ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता असल्याने भात, नाचणी रोपवाटिका, भुईमुग, हळद, आले, भाजीपाला, फुलशेती लागवड तसेच नारळ, सुपारी, केळी, पपई,नवीन फळबाग लागवड क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **खरीप भात** | रोप अवस्था | • **पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता तसेच दिनांक १२ जुलै, २०२१ पासून तुरळक ठिकाणी अत्यंत जोरदार पाऊसाची** |

| | | |
|---|---|---|
| | | **शक्यता असल्याने भात पुर्नलागवडीची कामे दिनांक ११ जुलै, २०२१ पर्यंत पूर्ण करून घ्यावीत.** तसेच पुर्नलागवड केलेल्या भात खाचरामध्ये पहिल्या ३० दिवसांपर्यंत पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करुन अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• पुर्नलागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये बांध बंधीस्ती करून चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस ८७० ग्रॅम युरिया, ३१३० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि ८४० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश प्रती गुंठा खते मिसळावीत. प्रति गुंठा ५० किलो गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस दिल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी करून द्यावी. सुफला (१५:१५:१५) द्वारे खते द्यावयाची असल्यास प्रती गुंठा ३ किलो मात्रा द्यावी.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी. (हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी. (निमगरव्या व गरव्या जातींसाठी) अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• **भात पुर्नलागवड १२ जुलै, २०२१ नंतर करावयाची झाल्यास जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता पुर्नलागवडीच्या वेळेला देणारी खतांची मात्रा पुढे ढकलावी.**<br>• **जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नदीकाठाजवळील भात शेतीमध्ये नदीतील पाणी शिरणार नाही याची व्यवस्था करावी.**<br>• **जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात खाचरात खेकड्यांच्या प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता** असल्याने बांधावरील खेकड्यांचे विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही.) |
| **नागली, वरी** | रोप अवस्था | • **पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता नागली, वरी पुर्नलागवड सुरु करावीत.**<br>• पुर्नलागवडीच्या वेळेस प्रती गुंठा ९०० ग्रॅम युरिया आणि २.५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ६६० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश किंवा सुफला (१५:१५:१५) द्वारे खते द्यावयाची असल्यास २.६ कि.ग्रॅ. प्रती गुंठा खताची मात्रा फोकून न देता ठोंब्यातून दयावी. रोपे उताराच्या आडव्या दिशेने ठोंबा पध्दतीने उथळ आणि उभी लावावीत. ३० दिवसांची रोपे एका ठोंब्यात दोन या प्रमाणे दोन ओळीत २० सें.मी. आणि दोन रोपात १५ सें.मी. अंतर ठेवून लावावीत. |
| **आंबा** | वाढीची अवस्था | • शिफारशीनुसार आंबा बागेमध्ये कल्टारची (पॅक्लोब्युट्राझोल) मात्रा १५ जुलै ते ३१ ऑगस्ट दरम्यान द्यावयाची असते. कल्टार देण्यासाठी पूर्वतयारी म्हणून झाडाभोवती असलेले तण काढून बाग स्वच्छ करावी. |
| **नारळ, सुपारी** | फळधारणा | • **पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता** नारळ, सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला पिके** | वाढीची अवस्था | • **पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता** भाजीपाला पिक क्षेत्रातून अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• वेलवर्गीय भाजीपाला फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असते. या |

| | | |
|---|---|---|
| | | फळमाशीच्या नियंत्रणासाठी फुले येण्यास सुरुवात होण्याच्या वेळी पिकामध्ये 'क्यु ल्युर' रक्षक सापळे प्रती एकरी २ या प्रमाणे मंडपात जमिनीपासून १ ते २ फुट उंचीवर राहील अशा प्रकारे टांगावा. सापळ्यात ठेवलेले आमिष ६ ते ७ आठवडे चांगल्या प्रकारे चालते. |
| **हळद** | वाढीची अवस्था | • **पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता** हळद पिकास देण्यात येणारी नत्र खतांची मात्रा पुढे ढकलावी आणि अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **आले** | वाढीची अवस्था | • **पुढील पाच दिवस जोरदार ते अति जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता लक्षात घेता** आले पिकातून अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र, कृषी विज्ञान केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.